अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

खास सभा

नोटीस.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र. १ ( ह ) अन्वये.)

अहमदनगर महानगरपालिका कार्यालय.

दिनांक : २१-२-२००७.

श्री./ श्रीमती........................................

सदस्य,

अहमदनगर महानगरपालिका.

यांस -

यांद्वारे कळविण्यांत येते की,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ ( ह ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा सोमवार दिनांक २६-२-२००७ रोजी दुपारी १-०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय पत्रिका व टिप्पणी.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

सोमवार दिनांक २८-२-२००७ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहात

होणां-या खास सभेपुढील विषय पत्रिका.

--*--

| | |
|---|---|
| १ | नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २००६-२००७ मध्ये १. बालिकाश्रम कोपरा ते नालेगांव हडको ते सिनानदी पर्यंत बंद पाईपची गटार बांधकाम करणे २. हडको पुलापर्यंत रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करणे ३. अमर हॉटेल ते रामवाडी चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे ४. एस.टी.स्टँण्ड ते माळीवाडा वेस पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेचे कामास व रूपये २,७३,००,००० /- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचे ऑफिस रिपोर्ट. |
| २ | अहमदनगर शहराच्या वाढीव हद्दीची प्रारुप विकास योजना प्रसिध्द केली असता प्राप्त झालेल्या हरकतीची सुनावणी साठी दिनांक ३१/१२/२००६ ते ३१/१२/२००७ पर्यंत मुदतवाढ मिळणे बाबतचे ऑफिस रिपोर्ट मंजूरीसाठी. |
| ३ | तृतीय विस्तारीत अंत्योदय योजना अतिरिक्त लाभार्थी अन्न योजनेसाठी अन्नधान्य वितरण अधिकारी अहमदनगर यांनी निवडलेल्या लाभार्थीच्या यादीस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४ | केडगांव भागात सांस्कृतीक सामाजिक व क्रिडा अशा विविध उपक्रमाकरीता बहुउद्येशिय इमारत व खेळाचे मैदान विकसित करणेसाठी आरक्षीत जागा मा.शासनाकडून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणेबाबतचे ऑफीस रिपोर्ट मान्यतेस्तव सादर. |
| ५ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक २१-२-२००७

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

कृपया टिप्पणी मागे पहा...

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

सोमवार दिनांक २८-२-२००७ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहात

होणां-या खास सभेपुढील विषया बाबतची टिप्पणी.

--*--

| अ.नं. | विषय | टिप्पणी |
|---|---|---|
| १ | नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २००६-२००७ मध्ये १. बालिकाश्रम कोपरा ते नालेगांव हडको ते सिनानदी पर्यंत बंद पाईपची गटार बांधकाम करणे २. हडको पुलापर्यंत रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करणे ३. अमर हॅाटेल ते रामवाडी चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे ४. एस.टी.स्टँण्ड ते माळीवाडा वेस पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेचे कामास व रूपये २,७३,००,००० /- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचे ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्टानुसार मंजुरीस्तव शिफारस आहे. |
| २ | अहमदनगर शहराच्या वाढीव हद्दीची प्रारुप विकास योजना प्रसिध्द केली असता प्राप्त झालेल्या हरकतीची सुनावणी साठी दिनांक ३१/१२/२००६ ते ३१/१२/२००७ पर्यंत मुदतवाढ मिळणे बाबतचे ऑफिस रिपोर्ट मंजूरीसाठी. | ऑफिस रिपोर्टानुसार मंजुरीस्तव शिफारस आहे. |
| ३ | तृतीय विस्तारीत अंत्योदय योजना अतिरिक्त लाभार्थी अन्न योजनेसाठी अन्नधान्य वितरण अधिकारी अहमदनगर यांनी निवडलेल्या लाभार्थींच्या यादीस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्टानुसार मंजुरीस्तव शिफारस आहे. |
| ४ | केडगांव भागात सांस्कृतीक सामाजिक व क्रिडा अशा विविध उपक्रमाकरीता बहुउद्येशिय इमारत व खेळाचे मैदान विकसित करणेसाठी आरक्षीत जागा मा.शासनाकडून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणेबाबतचे ऑफीस रिपोर्ट मान्यतेस्तव सादर. | ऑफिस रिपोर्टानुसार मंजुरीस्तव शिफारस आहे. |
| ५ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. | टिप्पणी नाही. |

दिनांक : २१-२-२००७.
अहमदनगर.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १ दिनांक : २८/०२/२००७.

.....................................................................................................................

**प्रस्तावाचा विषय** : नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २००६-२००७ मध्ये १. बालिकाश्रम कोपरा ते नालेगांव हडको ते सिना नदी पर्यंत बंद पाईपची गटार बांधकाम करणे. २. हडको पुलापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणे. ३. अमर हॉटेल ते रामवाडी चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. ४. एस.टी.स्टॅण्ड ते माळीवाडा वेसपर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरणेचे कामास व रु.२,७३,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचे ऑफिस रिपोर्ट.

---o---

**प्रस्तावाचा मजकुर** : उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रानुसार विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, सन- २००५-२००६ करीता एकूण निधी रुपये १२९.२ लक्ष महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे, त्यापैकी अनुसूचित जाती मधील दलित वस्त्यामध्ये शासन निर्णय नुसार मा. जिल्हाधिकारी यांचेकडील पत्र सु.ज.यो/वशी/११५५/२००६ दिनांक ७-१२-२००६ अन्वये ३४ कामे हाती घेण्यात येऊन त्याकामी रु. ८०,३०,१८५/- या रकमेच्या कामास प्रशासकीय मान्यता मिळाली असुन २००५-२००६ मधिल ५० लक्ष निधी सिध्दार्थनगर भागात पाण्याच्या टाकी बांधकामासाठी प्रस्तावित करण्यात आलेला आहे परंतु जागा उपलब्ध न झाल्याने सदर काम अद्याप होवु शकले नाही .

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग मंत्रालय मुंबई यांचे दि. ११ डिसेंबर २००६ चे पत्र पहाता रु.५०.० लक्ष निधी राखून ठेवल्याबाबत शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. पाणी पुरवठा करणे स्थानिक प्रशासनाची मुलभूत जबाबदारी आहे त्यावर सर्व साधारण निधीतून खर्च करणे क्रमप्राप्त आहे. असे नमुद केलेले आहे.

सध्या महानगरपालिकेकडे नागरी दलित वस्तीचा निधी सन- २००५- २००६ मधील १२९.० लक्ष पैकी ८०,३०,१८५/- लक्ष निधी ३४ कामावर वापरला जात आहे. पैकी ५०.० लक्ष निधी सिध्दार्थनगर पाण्याच्या टाकीचा शिल्लक आहे. सन- २००६-२००७ मध्ये रक्कम रु. १७५.० लक्ष निधी म न पा कडे प्राप्त झालेला आहे. एकूण निधी रु. २२५.० लक्ष उपलब्ध आहे.

सन- २००६-२००७ मध्ये खालील नमुद कामे प्रस्तावीत करण्यात येत आहेत. प्रभाग क्र. १० अनुसूचित जातीचा राखीव प्रभागअसुन त्या प्रभागामध्ये एकूण झोपडपट्ट्या तीन आहे. १) बालिकाश्रम २) दातरंगेमळा ३) ढोरवाडी या प्रमाणे या तिन्ही झोपडपट्ट्या लगत फार मोठा नाला वाहत असुन प्रत्येक पावसळ्यामध्ये अस्तित्वातील गटारीमधुन पुर्ण क्षमतेने पाणी वाहत नसल्याने सर्व पावसाचे पाणी वसाहतीमध्ये शिरुन वित्त हानी होत असते. तसेच तेथील नागरिकांकडुन रस्ता रोको, अंदोलन, मोर्चा यामार्गाचा अवलंब केला जातो. बालिकाश्रम कोपरा ते नालेगांव हडको ते सिना नदी पर्यंत बंद पाईपची गटर बांधकाम करणेकरीता अंदाजे रक्कम रु. १२५.० लक्ष खर्च अपेक्षित आहे.तसेच बालिकाश्रम कोपरा ते बागरोजा हाडको पुलापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणे आवश्यक आहे त्यासाठी रुपये २०.०० लक्ष खर्च अपेक्षीत आहे.

प्रभाग क्र. १४ व ४ हे प्रभाग अनुसूचित जातीसाठी राखीव असुन त्याप्रभागामध्ये तीन झोपडपट्ट्यांचा समावेश आहे. १) भारस्कर कॅालनी २) कॅम्प कौलारु ३) रामवाडी या तीनही झोपडपट्ट्यांकडे जाताना रस्ता अरुंद असून मोठा करणे गरजेचे वाटते. त्यासाठी अमर हॅाटेल ते रामवाडी चौक पर्यंत रस्ता रूंदीकरण व डांबरीकरण करणे गरजेचे असुन त्याकामी अंदाजे रक्कम रु. ८०.० लक्ष खर्च अपेक्षित आहे.तसेच एस.टी.स्टॅण्ड ते माळीवाडा वेस हा रस्ता प्रभाग क्र. ५ या राखीव प्रभागातुन जातो .सदर प्रभागात माळीवाडा हरीजनवस्ती ही झोपडपट्टी आहे.सदर रस्त्याचे रुंदीकरण डांबरीकरण करणेसाठी अंदाजे ४८.०० लक्ष खर्च अपेक्षीत आहे.

| **अ. नं** | **कामाचे नांव** | **अंदाजीत खर्च रक्कम** |
|---|---|---|
| **१** | बालिकाश्रम कोपरा ते नालेगांव हडको ते सिना नदी पर्यंत बंद पाईपची गटर बांधकाम करणे. | १२५.०० |
| **२** | हाडको पुलापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण | २०.०० |
| **३** | अमर हॅाटेल ते रामवाडी चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | ८०.०० |
| **४** | एस.टी.स्टॅण्ड ते माळीवाडा वेस पर्यंत डांबरी करण करणे | ४८.०० |

**एकुण = २.७३**

नागरी दलित वस्ती योजने अंतर्गत प्राप्त निधि पेक्षा जादा होणारा खर्च पुढील दलित वस्ती योजने अंतर्गत प्राप्त होणा-या निधीमधुन अगर महानगरपालिका फंडातुन करावा लागेल.

वरिल कामे हाती घेताना शासन निर्णय क्र.विघयो-१०२०००/१५९२/प्र. क्र १८९/नवि-४ मंत्रालय ३२ दि. ५ मार्च २००२ च्या पत्रान्वये सदरची कामे प्रस्तावित कलेली आहेत. सदरचा रिपोर्ट मंजुरीस्तव सविनय सादर.

सोबत- १) महाराष्ट्र शासन दि. ५ मार्च २००२ची शासन निर्णयाची प्रत.

२) महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २५ डिसेंबर २००३ ची प्रत.

३) दि. १/१/२००१ च्या जनगणनेनुसार झोपडपट्ट्यांची लोकसंख्या.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालाप्रमाणे मंजूरीस्तव सादर.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, शहर अभियंता यांचेकडील प्रस्तावाप्रमाणे रक्कम रु.२,७३,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यांस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (सामान्य) यांचा अभिप्राय की, प्रस्ताव विचारार्थ मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे हरकतीचे नाही.

यावर मा.महापौर सो, यांचा अभिप्राय की, मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट शहर अभियंता, अंतर्गत लेखा परिक्षक, मा.उपायुक्त (सामान्य), मा.आयुक्त सो, मा.महापौर सो, यांच्या अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.महासभेपुढे ठेविला.

--*--

**चर्चा :**

श्री.गिरवले : विषयांवर चर्चा न करता सर्व विषय मंजुर करावे व सभा संपविण्यांत यावी.

श्री.डागवाले : श्री.गिरवले यांनी जो विषय मांडला त्यास माझे पुर्ण अनुमोदन आहे.

श्री.उडाणशिवे : झोपडपट्टी दलितांची समस्यां दलित वस्त्यांत आहेत. दलित सुधारल्यावर शहराचा चेहरामोहरा बदलून दिसेल. सखोल चर्चा केली पाहिजे. दलित वस्ती सुधारणा अंतर्गत आलेला निधी ज्या हेतुसाठी आला आहे तो हेतु सफल झाला पाहिजे हा निधी दलित वस्ती सोडुन इतर ठिकाणी वापरला जातो. पाणीपुरवठा , पाईप लाईन, ड्रेनेज लाईन इत्यादी कामांचे

साठी दलित वस्तीतच वापरला पाहिजे. इतर ठिकाणाचे कामासाठी बजेटमध्ये भरीव तरतुद केलेलीआहे. या दलित वस्तीचा निधी इतर ठिकाणी खर्च करण्याची गरज काय आहे.

श्री.कानडे : अशा पध्दतीने विषयांस मंजुरी देण्यांत येत असेल तर आम्ही मान्यता देणांर नाही.

श्री.पवार : मा.श्री.उडाणशिवे यांच्या ज्या सुचना असतील त्या घेण्यांत याव्यात व तो विषय मंजुर करण्यांत यावा.

श्री.उडाणशिवे : बालिकाश्रम कोपरा ते हडको पुलापर्यंत रस्ता ऐवजी ढोरवाडी पासुन ते सिनानदी पर्यंत गटार करणेंत यावी. २. एस.टी.स्टॅण्ड ते माळीवाडा वेस पर्यंत ऐवजी तो वेशीपासुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयापर्यंत घेण्यांत यावा. हा रोड दलित वस्ती मधील आहे. अमर

हॉटेल ते रामवाडी चौक ऐवजी अप्पु हत्ती चौका पासुन फलटन चौकीपर्यंत हा रस्ता घेण्यात यावा ज्या ठिकाणी दलित वस्ती नाही त्या ठिकाणी रोड होत आहे.

मा.महापौर : सदर विषयाबाबत कोणाला काही सांगायचे आहे काय ?

श्री.पवार : पाण्याच्या टाकीचे काय झाले पाहिजे हेच आमचे म्हणणे आहे.

श्री.कानडे : दलित वस्ती सुधारणेसाठी २.७३ लाख रूपये आहे. I.T. शहर व्हावे हे माझे वैयक्तिक मत आहे. परंतु स्टॉल लावणे, अतिक्रमण करणे हे मान्य होणार नाही. नगर शहर सुंदर झाले पाहिजे आपण विषय पत्रिकेत सुचविलेले विषय अतिशय चांगले महत्वपुर्ण आहे. रूपये १५२ कोटीचे अंदाजपत्रक मान्य केले त्याबद्यल मी आपले अभिनंदन करतो. मा.शासन दलित वस्ती सुधारणे योजने अंतर्गत कामे करण्याचा मुळ उद्येश संकल्प दलित सुधारणा हे आहे. या दलितवस्त्यामध्ये व झोपडपट्टी मध्ये मुलभुत सुविधा पुरविल्या जाणे अत्यंत आवश्यक आहे.

सिध्दार्थनगरला पाण्याच्या टाकीसाठी वादंग झाले आहे. विषय मंजुर होवुन सुध्दा काम झाले नाही याबाबत प्रशासनाने माहिती द्यावी. दलित वस्तीच्या निधीचा विनियोग त्याच कामासाठी ख-या अर्थांनी होतो किंवा नाही याबाबत मला माहिती मिळावी.

मा.महापौर : जी आपणांस माहिती मिळाली आहे, ती चुकीची माहिती मिळाली आहे. स्वत: जिल्हा अधिकारी यांनी याबाबत मला माहिती दिलेली आहे व लक्ष घातलेले आहे.

श्री.कानडे : आपण चौकशीच्या फे-यातच अडकलेलो आहोत. काम का झाले नाही, संबंधित अधिका-याने का केले नाही त्याची चौकशी का झाली नाही. निधी त्या त्या वर्षी त्याच कामावर खर्च झाला पाहिजे. काम त्या त्या वेळी त्याच वर्षात झाले नाही तर का झाले नाही त्याची चौकशी केली पाहिजे व संबंधितांवर योग्य ती कार्यवाही केली पाहिजे. ही कामे वेळेवर झाली नाही व निधी वाया गेला तर दलित समाजावर अन्याय होत आहे.

मा.महापौर : पाण्याच्या टाकीचा विषय संपलेला आहे.

श्री.कानडे : मी शासनाचे निर्णयास धरूनच बोलतोय.

श्री.जाधव : दुसरे पत्र येणार आहे.

मा.महापौर : दुसरे पत्र येणार आहे.

श्री.चव्हाण : परिशिष्ट ६ मध्ये पाण्याची टाकी बांधणे योग्य आहे असे पत्र दिलेले आहे. व ते योग्य आहे. याबाबत श्री.उपायुक्त देशमुख व सिटी इंजिनिअर यांनी खुलासा करावा.

उपायुक्त (सा) : दि.७-१२-०६ मा.जिल्हाधिकारी यांनी मंजुरीदिली ३५ कामे होती. ३४ कामांना मंजुरी दिलेली आहे. शासनांस पत्र दिलेले आहे. सर्व निधी क्रमप्राप्त आहे. १.२९ कोटी मार्गदर्शक तत्वाप्रमाणे खर्च करण्यांत यावा असे कळविले होते.

मा.महापौर : ऑफिस रिपोर्ट पुर्ण लिहीण्यांत यावा अर्धवट रिपोर्ट लिहीण्यांत येवु नये.

श्री.कानडे : सन २००३ पासुन महानगरपालिका पासुन दलित वस्त्यांमध्ये किती निधी खर्च झाला सांगता येईल का ? आतापर्यंत दलित वस्त्यांसाठी आलेला निधी शिल्लक निधी व येणारा निधी याची माहिती मिळेल का ?

श्री.गिरवले : प्रश्नोत्तराच्या तासात आपला विषय द्यावा तो बोर्डात घेण्यात येईल.

श्री.मगर : श्री.मगर सिटी इंजि.यांनी दरवर्षी प्राप्त झालेल्या अनुदानाची माहिती दिली.

मा.महापौर : पुढील बोर्डात निधी कोठे खर्च झाला याबाबत सविस्तर घेवू.

श्री.कानडे : सध्याचे झोपडपट्टयामध्ये रस्ता नाही, नळ नाही, रोड नाही, अशी झोपडपट्टी आहे काय ? हद्यवाढीचा भाग धरून शौचालय नाही, कितीतरी झोपडपट्टया अशा आहेत की, त्या ठिकाणी मुळ सुविधा नाही, मात्र हे निवेदन का केलेले आहे

रामवाडी,नवनाथनगर,इत्यादी माझे वॉर्डातील अनेक ठिकाणी नळ नाही, पाणी नाही, अनेक सुविधा नाही.

मा.महापौर : दलित वस्तीतील कामे करावयाची आहे .

श्री.कानडे : प्रशासनाने जो विषय केलेला आहे तो शासन निर्णयानुसार योग्य आहे काय ?

मा.उपमहापौर : ही जी कामे घेतलेली आहे हे कोणा नगरसेवकाचे , महापौराचे किंवा विशिष्ट माणसाचे नाही. हे काम शहराचे आहे व शहराची कामे झाली पाहिजे.

श्री.कानडे : माझ्या वॉर्डातील दलित वस्ती असतांना त्या ठिकाणी लाईट , पाणी रस्ते इ.नाहीत. मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त : दलित वस्ती निधी महानगरपालिका निधी मिळुन एकुण प्रस्ताव करून मा.शासनाचे शासन निर्णयाप्रमाणे राखीव विभागात खर्च केला पाहिजे.

मा.महापौर : ३ तारखेला बैठक घेवुन चर्चा करणार आहोत.

श्री.कानडे : अहमदनगर शहर I.T. झाले पाहिजे. परंतु दलित वस्त्यांमध्ये अद्याप रस्ते नाही, पाणी नाही, गटारी नाही, मला शब्द असा हवा आहे की, दलित वस्तीची कामे बजेट मध्ये घ्या परंतु त्यावर काही विचार झालेला नाही. १ कोटीचे प्रस्ताव तयार केले परंतु त्यावर काहीच कार्यवाही झाली नाही.

सभागृहामध्ये श्री.डागवाले,श्री.गिरवले, श्री.मैड व श्री.कानडे इत्यादींनी एकाच वेळी चर्चा मुळे गोंधळ.

श्री.कानडे : कोणत्या सदस्याचे यादीवरून ही कामे करण्यांत आली आहे याची माहिती द्यावी.

मा.उपमहापौर : याद्या दिलेल्या नाहीत. महापौर साहेबांनी सुचविलेले आहे.

श्री.गिरवले : सामान्य नागरिकांनी कामे सुचविली तरी चालते.

श्री.कानडे : माझ्या प्रभागामधील कामे करावी व शासन निर्णयानुसारच खर्च करावा.

मा.महापौर : ३ तारखेला सदस्यांची मिटींग आयोजित केलेली आहे. एक महिन्याचे कालावधीत २.५० ते ३ कोट रूपये मिळणार आहे.

श्री.कानडे : मा.शासन निर्णयानुसार अंमलबजावणी व्हावी , दलित वस्तीचा निधी , दलित वस्ती मध्येच खर्च व्हावा ही विनंती.

श्री.गिरवले : दलित वस्ती शेजारचा व पोट रस्ता घेतला तर काही चुक नाही, आता दलित वस्तीमध्ये कोटयावधी रूपये खर्च झालेले आहे. झोपडपट्टीत जेथे गरज आहे तेथे खर्च करा.

सौ.भागानगरे : माझ्या प्रभागामध्ये पाण्याचा प्रश्न गंभीर आहे, केदारनगर शास्त्री वस्ती इत्यादी ठिकाणी कामे करावी.

श्री.कृष्णा जाधव : दलित वस्तीसाठी आलेला पैसा डब्ल्यु.बी.एम.साठी त्या नगरसेवकाचे वॉर्डात वापरला जातो. तरी सदरचा निधी पाण्याचे टाकीसाठीच खर्च व्हावा.

श्री.चव्हाण : मा.जिल्हाधिकारी यांचेकडे ३४ कामाचा ठराव पाठविला हा विषय इकडे आला कसा.

श्री.चव्हाण : मा.जिल्हाधिकारी कडे ३४ कामाचा ठराव पाठविला होता. ठराव नं. ८२५ हा विषय इकडे आला कसा १७ क प्रमाणे स्थायी समितीत घेतला होता. सभागृहामध्ये आला कसा ही कामे मागे मा.स्थायी समितीत घेतली गेलेली आहे. बजेटमध्ये तरतुद असेल तर देतो परंतु १० लाखा पेक्षा जास्त व गेले बजेट मध्ये तरतुद केलेली होती. सन २००५-२००६ मध्ये तोच रस्ता आहे. ४ ठिकाणी प्रोव्हीजन करण्यात आलेली आहे. बालिकाश्रम रोड ते अमरधाम ठेकेदाराला दिलेला आहे. नालीचे प्रोव्हीजन केलेले आहे. ७५ लाखाची तरतुद केली. ९६ लाखाची तरतुद केली. ठराव दोन झाले , दोन बीले लावुन घेतले तर त्याचे काय ? काम रद्य केलेले नाही. प्रशासक ठराव क्र. १०६ दि.१-११-२००० , ५० % रक्कम दिलेली आहे. दलित वस्ती मधील घेतलेले गटारीचे १.२० लाखाचे काम कमी करा.

श्री.मगर : लालटाकी ते दिल्लीगेट या रस्त्याचे झालेल्या गटारीचे बील अद्याप दिलेले नाही.

श्री.चव्हाण : अमरधाम ते दिल्लीगेटचे कामाचा सातपुते यांनी एस्टीमेंट केलेले आहे.

श्री.मगर : आयुर्वेद कोपरा ते दिल्लीगेट या रस्त्याचे कडेला आयुर्वेद हॉस्पीटल ते अमरधाम येथे बांधलेल्या गटारीचे रनिंग बील देण्यांत आलेले आहे.

श्री.चव्हाण : कॉंक्रिटीकरण नाही, सांस्कृतिक भवन बांधा , एक दोन रस्त्याची कामे झाली पाहिजे.

श्री.लोंढे : मी कार्यक्रम नेमलेले आहेत. माझे प्रभागातील व शहरातील भव्यकाम नाशिक व पुणेच्या धरतीवर गटारी रस्ते करण्यांसाठी माहिती मागवुन पुढील बोर्डात ठेवणार आहे.

श्री.त्रिपाठी : बालिकाश्रम ते अमरधाम रोडचे काम मार्गी लावले पाहिजे. गेल्या पावसाळयामध्ये केदारवस्तीला भेट दिली होती. पाणी अडल्यामुळे पाणी वस्तीत घुसले होते. व आम्हांला अडकुन रहावे लागेल. ८० लाखाची कामे मंजुर केली व माझी कामे जाणुन बुजून घेतलेली नाही केदारवस्तीतील ४ घरे पडली होती. या संदर्भात मिटींग सुध्दा आयोजित केलेली आहे. कोठी येथील शौचालय बाबत सध्या २८-५-०४ व ३-२-०४ मिटींग आयोजित केली होती.

श्री.मगर : सार्व.शौचालय बांधणे बाबत बांधा आणि वापरा या धर्तीवर ठराव घेतलेला आहे.

मा.महापौर : ३ तारखेला मिटींग घेणार आहे.

श्री.त्रिपाठी : कोठीवरील संडासाचे कामांस परवानगी द्यावी.पोलिस कल्याण केंद्रापासुन उतार आहे. बालिकाश्रम पासुन न घेता पोलिस कल्याण केंद्रापासुन घेण्यात यावे. तसेच अमर हॉटेल चौकते रामवाडीपर्यंत घेतलेले ते फलटण पोलिस चौकी पर्यंत घेण्यांत यावे.

श्री.सोमनाथ लोंढे : गटार जी मंजुर केलेली आहे. त्याचे अभिनंदन करतो.

**ठराव : १)** ऑफिस रिपोर्ट व साधक - बाधक झालेल्या चर्चेचा विचार करता दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. खर्च मंजुर. सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या भावनांचा विचार करता सिध्दार्थनगर येथे पाण्याची टाकी बांधणेकरीता जागेची उपलब्धता अत्यंत महत्वाची आहे. याकरीता जिल्हापरिषद कर्मचारी वसाहत मधील ओपन स्पेसची जागा एक महिन्याचे आत ताब्यात घेण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

दलित वस्ती पाणी पुरवठा योजनेच्या गठीत केलेल्या समितीची बैठक दिनांक ०३/०३/२००७ रोजी आयोजित करणेत आली आहे. त्यामध्ये सन्माननीय सदस्यांचे सुचना विचारात घेवुन त्यानुसार देखील प्रस्ताव तयार करण्याबाबत प्राधान्य देण्यात यावे. नियमानुसार कार्यवाही करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सुचक : मा.श्री.किशोर आसाराम डागवाले.

अनुमोदक : मा.श्री. त्रिपाठी सुनिल चंद्रभुषण.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १ दिनांक : २८/०२/२००७.

......................................................................................................................

**प्रस्तावाचा विषय** : नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत सन २००६-२००७ मध्ये १. बालिकाश्रम कोपरा ते नालेगांव हडको ते सिना नदी पर्यंत बंद पाईपची गटार बांधकाम करणे. २. हडको पुलापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणे. ३. अमर हॉटेल ते रामवाडी चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. ४. एस.टी.स्टॅण्ड ते माळीवाडा वेसपर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरणेचे कामास व रु.२,७३,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबतचे ऑफिस रिपोर्ट.

---०---

**प्रस्तावाचा मजकुर** : उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रानुसार विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, सन- २००५-२००६ करीता एकूण निधी रुपये १२९.२ लक्ष महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे, त्यापैकी अनुसूचित जाती मधील दलित वस्त्यामध्ये शासन निर्णय नुसार मा. जिल्हाधिकारी यांचेकडील पत्र सु.ज.यो/वशी/११५५/२००६ दिनांक ७-१२-२००६ अन्वये ३४ कामे हाती घेण्यात येऊन त्याकामी रु. ८०,३०,१८५/- या रकमेच्या कामास प्रशासकीय मान्यता मिळाली असुन २००५-२००६ मधिल ५० लक्ष निधी सिध्दार्थनगर भागात पाण्याच्या टाकी बांधकामासाठी प्रस्तावित करण्यात आलेला आहे परंतु जागा उपलब्ध न झाल्याने सदर काम अद्याप होवु शकले नाही .

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग मंत्रालय मुंबई यांचे दि. ११ डिसेंबर २००६ चे पत्र पहाता रु.५०.० लक्ष निधी राखून ठेवल्याबाबत शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. पाणी पुरवठा करणे स्थानिक प्रशासनाची मुलभूत जबाबदारी आहे त्यावर सर्व साधारण निधीतून खर्च करणे क्रमप्राप्त आहे. असे नमुद केलेले आहे.

सध्या महानगरपालिकेकडे नागरी दलित वस्तीचा निधी सन- २००५- २००६ मधील १२९.० लक्ष पैकी ८०,३०,१८५/- लक्ष निधी ३४ कामावर वापरला जात आहे. पैकी ५०.० लक्ष निधी सिध्दार्थनगर पाण्याच्या टाकीचा शिल्लक आहे. सन- २००६-२००७ मध्ये रक्कम रु. १७५.० लक्ष निधी म न पा कडे प्राप्त झालेला आहे. एकूण निधी रु. २२५.० लक्ष उपलब्ध आहे.

सन- २००६-२००७ मध्ये खालील नमुद कामे प्रस्तावीत करण्यात येत आहेत. प्रभाग क्र. १० अनुसूचित जातीचा राखीव प्रभागअसुन त्या प्रभागामध्ये एकूण झोपडपट्ट्या तीन आहे. १) बालिकाश्रम २) दातरंगेमळा ३) ढोरवाडी या प्रमाणे या तिन्ही झोपडपट्ट्या लगत फार मोठा नाला वाहत असुन प्रत्येक पावसळ्यामध्ये अस्तित्वातील गटारीमधुन पुर्ण क्षमतेने पाणी वाहत नसल्याने सर्व पावसाचे पाणी वसाहतीमध्ये शिरुन वित्त हानी होत असते. तसेच तेथील नागरिकांकडुन रस्ता रोको, अंदोलन, मोर्चा यामार्गाचा अवलंब केला जातो. बालिकाश्रम कोपरा ते नालेगांव हडको ते सिना नदी पर्यंत बंद पाईपची गटर बांधकाम करणेकरीता अंदाजे रक्कम रु. १२५.० लक्ष खर्च अपेक्षित आहे.तसेच बालिकाश्रम कोपरा ते बागरोजा हाडको पुलापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणे आवश्यक आहे त्यासाठी रुपये २०.०० लक्ष खर्च अपेक्षीत आहे.

प्रभाग क्र. १४ व ४ हे प्रभाग अनुसूचित जातीसाठी राखीव असुन त्याप्रभागामध्ये तीन झोपडपट्ट्यांचा समावेश आहे. १) भारस्कर कॅालनी २) कॅम्प कौलारु ३) रामवाडी या तीनही झोपडपट्ट्यांकडे जाताना रस्ता अरुंद असून मोठा करणे गरजेचे वाटते. त्यासाठी अमर हॅाटेल ते रामवाडी चौक पर्यंत रस्ता रूंदीकरण व डांबरीकरण करणे गरजेचे असुन त्याकामी अंदाजे रक्कम रु. ८०.० लक्ष खर्च अपेक्षित आहे.तसेच एस.टी.स्टॅण्ड ते माळीवाडा वेस हा रस्ता प्रभाग क्र. ५ या राखीव प्रभागातुन जातो .सदर प्रभागात माळीवाडा हरीजनवस्ती ही झोपडपट्टी आहे.सदर रस्त्याचे रुंदीकरण डांबरीकरण करणेसाठी अंदाजे ४८.०० लक्ष खर्च अपेक्षीत आहे.

| **अ. नं** | **कामाचे नांव** | **अंदाजीत खर्च रक्कम** |
|---|---|---|
| **१** | बालिकाश्रम कोपरा ते नालेगांव हडको ते सिना नदी पर्यंत बंद पाईपची गटर बांधकाम करणे. | १२५.०० |
| **२** | हाडको पुलापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण | २०.०० |
| **३** | अमर हॅाटेल ते रामवाडी चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | ८०.०० |
| **४** | एस.टी.स्टॅण्ड ते माळीवाडा वेस पर्यंत डांबरी करण करणे | ४८.०० |

**एकुण = २.७३**

नागरी दलित वस्ती योजने अंतर्गत प्राप्त निधि पेक्षा जादा होणारा खर्च पुढील दलित वस्ती योजने अंतर्गत प्राप्त होणा-या निधीमधुन अगर महानगरपालिका फंडातुन करावा लागेल.

वरिल कामे हाती घेताना शासन निर्णय क्र.विघयो-१०२०००/१५९२/प्र. क्र १८९/नवि-४ मंत्रालय ३२ दि. ५ मार्च २००२ च्या पत्रान्वये सदरची कामे प्रस्तावित कलेली आहेत. सदरचा रिपोर्ट मंजुरीस्तव सविनय सादर.

सोबत- १) महाराष्ट्र शासन दि. ५ मार्च २००२ची शासन निर्णयाची प्रत.

२) महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २५ डिसेंबर २००३ ची प्रत.

३) दि. १/१/२००१ च्या जनगणनेनुसार झोपडपट्ट्यांची लोकसंख्या.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालाप्रमाणे मंजूरीस्तव सादर.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, शहर अभियंता यांचेकडील प्रस्तावाप्रमाणे रक्कम रु.२,७३,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यांस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (सामान्य) यांचा अभिप्राय की, प्रस्ताव विचारार्थ मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे हरकतीचे नाही.

यावर मा.महापौर सो़, यांचा अभिप्राय की, मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट शहर अभियंता, अंतर्गत लेखा परिक्षक, मा.उपायुक्त (सामान्य), मा.आयुक्त सो़, मा.महापौर सो़, यांच्या अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.महासभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा :

१ अ ) बाबत सभागृहामध्ये झालेली चर्चा :

श्री.जोशी + आगरकर : जकात ठेकेदारा विरूध्दचा विषय जो आहे तो Sensetive आहे. मा.श्री.भानुदास कोतकर यांनी जी जकात ठेकेदारा विरूध्द तयार केलेली आहे व वर्तमानपत्रात बातम्या आलेले आहेत ते म.न.पा.चे नुकसान लॉस करणारी आहेत. कायदेशीर बाबी निर्माण झाल्या आहेत. गेल्या तीन दिवसात झालेल्या घडलेल्या कृत्याबद्यल CID चौकशी लावावी.

आजअखेर जकात विभागाकडील फिरते पथकाने धरलेला माल व त्याची वसुल पात्र रक्कम जकात ठेकेदाराने महानगरपालिकेकडे भरलेली नाही. याबाबत संबंधित अधिका-यावर कोणतीही दखल घेतली गेली नाही. आयुक्त सो.यांना माहिती नाही.

श्री.कृष्णा जाधव : अजंठयावरचे विषय घ्या. ठेका कोणी मंजुर केला त्यावेळी स्थायी समिती कोणाकडे होती.

आगरकर : महानगरपालिकेचे हिताचे असेल तर संकेत पाळुन विषय घेतला पाहिजे. श्री.आगरकर , कृष्णा जाधव जोशी इत्यादी यांचा चर्चेत गोंधळ.

श्री.जोशी : दि.१७-२-०७ रोजी पत्र देवुन पारगमनाने किती पैसे जमा झाले व कुठल्या हेडखाली किती रक्कम जमा झाली ते कळवा असे पत्र दिलेले असतांना देखील अद्याप माहिती देण्यांत आलेली नाही.

श्री.घुले सा : गेल्या ३ तासापासुन विषय क्र.१ वर चर्चा झाली जकातीचा प्रश्न उपस्थित झाला प्रशासनाचा धिक्कार केला याचा दु:ख होतो. जकात ठेका युतीच्या काळातच मंजुर झालेला आहे. ( सभागृहात चर्चेत गोंधळ ) श्री.आगरकर + जोशी + भाजपाचे सर्व नगरसेवकांनी गोंधळ केला.

श्री.घुले : जकात ठेकेदाराने मारहाण करण्यापर्यंतच्या बातम्या वर्तमानपत्रात आल्या होत्या. तरी देखील भा.ज.पा.युतीने एका रात्रीतुन परत त्याच ठेकेदाराला ठेका कसा दिला गेला. अनंत जोशी श्री.भानुदास कोतकर यांनी सुचना मांडली असेल तर परत टेंडर काढा व त्याच्या सुचना द्या.

श्री.फुलसौंदर : जेंव्हा जकातीचा ठेका सुरू केला सर्वांनी मंजुर केला भा.ज.पा कार्यकर्ते व सर्व पक्षाचे कार्यकर्ते ठेकेदाराकडुन जावुन माहिती घेवुन कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे. आता सर्व सदस्यांनी चर्चा करून कार्यवाही करणेबाबत ठरवुन याबाबत व डिपॉझीट बाबत विचार केला पाहिजे.

श्री.बनकर यांनी मागील जनरल बोर्डातील ठरावातील अटी व शर्ती वाचुन दाखविल्या.

श्री.आगरकर : वेबसाईटवर अटी व शर्ती आलेल्या नाहीत. २ टर्म कंडीशन घातलेल्या नाहीत. जी नोटीस काढलेली आहे. त्या टर्म कंडीशन व हया ठरावातील कंडीशन जुळतात का ?

श्री.चव्हाण : कार्यवाही करावी. कार्यवाही करण्याचा अधिकार स्थायी समिती व जनरल बोर्डाला आहे टेंडर रद्य करावा व आयत्या वेळचा विषय घेवुन फ्रेश टेंडर काढण्यांत यावा.

कार्यवाही काय करणार डिपॉझीट देणे किंवा कसे ? याबाबत विचार करावा दोन गुन्हे घडलेले आहे.

श्री.आगरकर : फ्लाईंग स्कॉड ने किती ठिकाणी माल पकडला व किती ठिकाणी किती दंडाची रक्कम वसुल झाली या बाबत चौकशी करा याबाबत आयुक्त व उपायुक्त यांनी चौकशी देखील केली नाही, याबाबत निषेध करण्यात येत आहे.

श्री.भानुदास कोतकर : ठेक्याबद्यल रात्रभर बोलयच आणि ठेका त्यालाच द्यायचा पुर्वीचे टेंडर रद्य करून परत टेंडर काढणे व परत या सभासदांचे भावना लक्षात घेवुन अटी व शर्ती लक्षात घेवुन टेंडर देण्यात येईल. नागापुर नाका, मनमाड नाका इ.ठिकाणी पारगमनचे १२० रूपयाचे २४० रूपये व १०० रूपयाचे १६० रूपये घेतले गेले प्रशासनाने त्याची दखल घेतली नाही, कोणतीही कार्यवाही केली नाही, प्रशासन कमकुवत झालेले आहे. कुठून लोक आले काय भाषा वापरतात. एल आणि एम ब्लॉक बाबतही अडचणी निर्माण झाल्या आहेत.

श्री.भानुदास कोतकर :- या विषया बाबत ४ सदस्यांची समिती नेमावी व त्यांना अधिकार देण्यात यावे. समिती आजच नेमावी. नोटीसीची मुदत ७ दिवसाची होती आता १ दिवस शिल्लक राहीलेला आहे. आजच दुरुस्त नोटीस देण्यात यावी.

श्री.कृष्णा जाधव :- सभागृहात रुलिंग द्यावे. समिती नेमावी. नगरसेवकाला नाका चेक करण्याचा अधिकार आहे कि नाही प्रशासनाने खुलासा करावा. संघटनेच्या अधिका-यांना तपासणी बाबत पायबंद करावा. दिलेले टेंडर रद्द करावे व नविन टेंडर काढण्यात यावे.

श्री.गिरवले :- जकातीचा ठेकेदार हा जास्त पैसे आकारतो. विविध पक्षाचे लोकांनी चौकशी करुन मा.आयुक्तांकडे तक्रारी केल्या. उपायुक्त गेले पंचनामा केला तक्रार केली त्याला अटक का झाली नाही. आयुक्त यांनी याबाबत विचार केला पाहिजे डिपॉझिट मधुन ४ ते ६ महिन्याची

रक्कम वसुल करावी आयुक्त यांनी प्रत्यक्ष जावुन अनुभव घ्यावे तातडीने अंमलबजावणी करावी कळकळीची विनंती आहे.

श्री.जोशी :- यास मी अनुमोदन देतो.

मा.महापौर :- मा.आयुक्त खुलासा करतील.

उपायुक्त श्री.लहाने :- २५ फेब्रुवारी २००७ रोजी निवेदन दिलेले आहे. समजची नोटीस दिलेली आहे. साई एन्टरप्रायजेस यांनी कराराचा भंग केल्याचे विरुध्द शोकॉज नोटीस दिलेली आहे. कमिटी नेमण्याची तरतुद नाही. मा.आयुक्त यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी घेवुन जावू शकतात.

श्री.भानुदास कोतकर :- अशी तरतुद आहे का ? नगरसेवकाची कमिटी नेमता येत नाही. नगरसेवकाची समिती स्थापन करता येणार नाही का ? अधिका-यांवर आमचा विश्वास नाही असे आमचे म्हणणे आहे. कोणताही कर्मचारी कामाला सक्षम नाही जनरल बोर्डाला सर्व अधिकार आहे.

मा.महापौर :- शॉर्ट नोटीस देवुन नविन टेंडर काढणेत यावे आजच नविन टेंडर काढणेत यावे. सूचना ॲड करुन घेण्यात यावी. ठेकेदाराला शासन झाला पाहिजे.

-- *--

१ अ ) प्रस्ताव क्रमांक १ बाबत चर्चा अंतिम टप्प्यात येवून ठराव मंजुर करणेत आला व दरम्यानचे कालावधीत सन्माननीय सदस्य यांनी यापुर्वी अहमदनगर महानगरपालिकेने जकात कर वसुली कामी जकात अभिकर्ता नेमलेला आहे. सदर जकात अभिकर्त्याने केलेल्या निराशाजनक कामगिरी बद्दल औचित्याचा मुद्दा सभागृहामध्ये उपस्थित करीत असल्याबाबत जाणीव करुन दिली. जकात अभिकर्ता यांची शहरातील व्यापारी बांधवांना विनाकारण त्रास देण्याची भूमिका तसेच महानगरपालिका कराराचा भंग करण्याची कार्यपध्दती या सर्व बाबींवर सांगोपांग चर्चा झाली त्यानुसार सभागृहामध्ये उमटलेल्या संतप्त प्रतिक्रीयांचा विचार करता शहरातील जनता व्यापारी यांना होणा-या त्रासाची जाणीव या सभागृहास असलेने त्यांचे महत्व लक्षात घेता पुढील प्रमाणे ठराव ही सभा सुरु असलेल्या कामकाजात करीत आहे.

**ठराव :-** ठरविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेची अंदाजपत्रकीय सभा दि.२०/०२/२००७ रोजी झाली त्यामध्ये साई एंटरप्राईजेस जकात अभिकर्ता अहमदनगर महानगरपालिका यांचे कामातील अक्षम्य चुकांचा विचार करुन त्यांचेवर पुढील कारवाई करणेत दिलेल्या मान्यतेनुसार प्रशासनाने सदर कारवाई करावी तसेच करदाते व्यापारी नागरीक यांचेकडुन महानगरपालिकेने घालून दिलेल्या नियमावली व्यतिरिक्त बेकायदेशिररित्या दहशत पध्दतीचा अवलंब करुन अवैध पध्दतीने वसुल केलेल्या रकमां बाबत माहिती संकलीत करण्यात यावी व बँक गॅरंटीच्या रकमे मधुन सदरची रक्कम वसुल करण्यात यावी. अलीकडेच अशा पध्दतीच्या कामकाजामुळे जकात अभिकर्ता यांचेवर फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल झालेला आहे याचा देखिल विचार प्रशासनाने करावा. तसेच सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाकरीता अहमदनगर महानगरपालिकेने यापुर्वी राबविलेली जकात वसुली कामीची निविदा प्रक्रीया पुर्णपणे रद्द करावी व अंदाजपत्रकीय सभा दि.२०/०२/२०० अन्वये मंजूर केलेल्या अटी शर्तीचा समावेश करुन जकात कर वसुली करणे कामी नव्याने निविदा प्रकरण सुरु करण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक : मा.श्री.किशोर डागवाले.

अनुमोदक : मा.श्री.सुनिल त्रिपाठी

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : २ दिनांक : २८/०२/२००७.

.................................................................................................................

**प्रस्तावाचा विषय** : विकास योजना अहमदनगर ( वाढीव हद्द ) कलम २१ व २६ अन्वयेच्या मुदतवाढी मंजुर करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

---o---

**प्रस्तावाचा मजकुर** : उपरोक्त संदर्भीय ठरावान्वये अहमदनगर शहराच्या वाढी हद्दीची प्रारुप विकास योजना प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच याच ठरावान्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम २१ अन्वये दि.०१/०७/२००४ ते ३१/१२/२००६ पर्यंत मुदतवाढ मंजुर करणेत आलेली आहे. तर कलम २६ अन्वये दि.११/०५/२००४ ते १०/०५/२००६ पर्यंत मुदत वाढ मंजुर करणेत आलेली आहे.

कलम २१ अन्वये कोणतेही क्षेत्र महानगरपालिकेत अथवा नगरपालिकेत समाविष्ट झाल्यानंतर तीन वर्षाच्या कालावधीत किंवा वेळोवेळी वाढवुन दिलेल्या मुदतीत या क्षेत्रासाठी विकास योजना तयार करुन ती शासनास मंजुरीसाठी सादर करणे अनिवार्य असते. आता या वाढीव क्षेत्राची विकास योजना प्रसिध्द करुन त्याबाबत हरकती/सूचना मागविण्यात आलेल्या आहेत. विहित मुदतीत एकुण ३५५ इतक्या हरकती प्राप्त झालेल्या आहेत. आता या हरकतींची सुनावणी घेणेसाठी नियोजन समिती गठीत करणेत येत आहे. या नियोजन समितीने आपला अहवाल मा.महासभेस सादर केल्यानंतर व त्यास मा.महासभेची अंतीम मंजुरी मिळाल्यानंतर सदरची विकास योजना शासनास सादर करणेत येईल. या कामी अजुनही सुमारे १ वर्षाचा कालावधी लागणार असल्याने कलम २१ अन्वये दि.३१/१२/२००६ ते ३१/१२/२००७ पर्यंत मुदत वाढ मंजुर करण्याचा प्रस्ताव मा.महासभेस सादर करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम कलम २६ (१) अन्वये विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहिर केल्यापासुन २ वर्षाच्या मुदतीत किंवा वेळोवेळी वाढवुन दिलेल्या मुदतीत ही विकास योजना प्रसिध्द करणे आवश्यक असते. मा.महासभेने ही मुदत दि.१०/०५/२००६ पर्यंत वाढवुन देण्यास मंजुरी दिलेली आहे. आता ही विकास योजना ठराव क्र.७ दि.१७/०५/२००६ अन्वये प्रसिध्द झालेली असुन त्याबाबतचे जाहिर प्रकटन शासन

राजपत्रात दि.२७/०७/२००६ रोजी प्रसिध्द झालेले आहेत. सबब मा.महासभेत दि.१०/०५/२००६ ते २७/०७/२००६ पर्यंत कलम २६ (१) अन्वये मुदत वाढ मागण्याचा प्रस्ताव मा.महासभेत सादर करणे आवश्यक आहे.

सबब वरील प्रस्ताव मा.महासभेत मंजुरीसाठी शक्य तितक्या लवकर सादर होणे आवश्यक आहे. आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, नगररचनाकारांच्या अभिप्रायाप्रमाणे पस्ताव मंजुरीसाठी मा.महासभेपुढे ठेवणे योग्य.

यावर मा.महापौर साहेब, यांचा अभिप्राय की, मा.सर्व साधारण सभेपुढे प्रस्ताव ठेवणेंत यावा.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (कर), मा.आयुक्त साो, मा.महापौर साो, यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.महासभेपुढे ठेविला.

--*--

**चर्चा :**

श्री.नामदेव पवार : विषय मंजुर करण्यांत यावा.

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर शहराच्या वाढीव हद्दीची प्रारूप विकास योजनेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २१ नुसार दिनांक १-१-२००७ ते ३१-१२-२००७ पर्यंत मुदतवाढ देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच कलम २६ नुसार प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे दि.११-५-०६ ते ३१-७-०६ अखेर मुदतवाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

ऑफिस रिपोर्ट मंजुर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री. नामदेव शांताराम पवार.

अनुमोदक : मा.श्री. किशोर आसाराम डागवाले.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ३ दि.२८-२-२००७.

..................................................................

**प्रस्तावाचा विषय** - तृतीय विस्तारीत अंत्योदय योजना अतिरिक्त लाभार्थी अन्न योजनेसाठी अन्नधान्य वितरण अधिकारी अहमदनगर यांनी निवडलेल्या लाभार्थींच्या यादीस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

--*--

**प्रस्तावाचा मजकूर** - अन्न वितरण अधिकारी,अहमदनगर यांनी त्यांचेकडेस प्राप्त झालेले तृतीय विस्तारीत अंत्योंदय योजना अतिरिक्त लाभार्थी निवडीची यादी त्यांचेकडील पत्र क्र.कावि /४/५०१/०६ दिनांक ७/९/२००६ अन्वये इकडेस पाठवून सदर २९६ लाभार्थीची यादीस मा.सर्व साधारण सभेची मंजुरी घेण्याबाबत कळविले आहे.

अन्नधान्य वितरण यांनी सादर केलेल्या २९६ लाभार्थीपैकी २८९ लाभार्थी शहर हद्दीतील आहेत.व ७ लाभार्थी हद्दीबाहेर आहेत.सदरच्या हद्दीबाहेरील ७ लाभार्थीच्या नावास योग्य त्या प्राधिकरणाची मंजुरी घ्यावी याबाबत अन्न धान्य वितरण अधिकारी ,अहमदनगर यांना इकडील पत्र सुजयो जा.क्र.४७ दिनांक १/११/०६ अन्वये कळविले आहे.

मा.महाराष्ट्र शासन अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक साविव्य १००३/२६७२/प्र.क्र.१२८८ / ना.पु २८ मुंबई ३२ दिनांक १६ ऑक्टोंबर २००३ अन्वये विस्तारीत अंत्योदय अन्न योजना निवड व अंमलबजावणीबाबत मा.शासन निर्णयानुसार सदर योजनेअंतर्गत लाभार्थी कुंटुंबाची निवड करणेकरीता प्राथम्य गट ठरविण्यात आलेले असून शहरी भागातील शासन निर्णयानुसार प्राथम्य गट खालीलप्रमाणे.

१.ज्या कुटुंबांचे प्रमुख विधवा स्त्रिया अथवा आजारी वा अपंग किंवा ६० वर्षावरील वृध्द आहेत व ज्यांना उदर निर्वाहाचे निश्चित साधन नाही अथवा सामाजिक आधार नाही.

२.एकटे रहात असलेले दुर्धर आजारग्रस्त / अपंग / विधवा ६० वर्षावरील वृध्द ज्यांना कुठलाही कौटुंबीक वा सामाजीक आधान नाही.

३. आदीम आदिवासी कुटुंबे.

सदर निकषांनुसार निवड करण्यात आलेल्या २८९ (दोनशे एकोणनव्वद फक्त ) लाभार्थीची यादी अन्न धान्य वितरण अधिकारी ,अहमदनगर यांनी इकडेस सादर केलेली आहे.वरील परिपत्रकात नमुद केल्याप्रमाणे " एकूण अर्जामधून ठरविण्यात आलेल्या संख्येनुसार पात्र लाभार्थीची निवड करण्यात यावी.लाभार्थ्यांनी अर्ज भरुन दिल्यानंतर अर्जाची छाननी करावी व लाभार्थीची निवड निश्चित झाल्यानंतर संबंधीत ग्रामसभा,नगरपरिषदा व महानगरपालिका यांची सदर यादीस मान्यता घेण्यात यावी.वरील निकषानुसार निवड केलेली प्राथमिक यादी तयार झाल्यानंतर गाववार / वॉर्ड निहाय / परिमंडळ निहाय यादया तयार करुन त्या ग्रामसभा / नगरपालिका / महानगरपालिका यांचेकडून तात्काळ मंजूर करुन घेण्याबाबत परिपत्रकातील पान नंबर २ वरील मुददा क्रमांक २ व ३ अन्वये कळविलेले आहे "

सदरच्या अन्नधान्य वितरण अधिकारी,अहमदनगर यांनी इकडेस सादर केलेल्या २८९ लाभार्थीच्या पात्रतेबाबत चौकशी करुन अभिप्राय सादर करणेकरीता संबंधीत वॉर्डचे प्रभारी विभाग अधिकारी यांना आदेश देण्याच्या दिनांक १३/९/०६ च्या ऑफीस रिपोर्टवर मा.उपायुक्त (कर ) यांचा अभिप्राय असा की " प्रस्ताव अ प्रमाणे कार्यवाही करणे योग्य " सदरच्या ऑफीस रिपोर्ट वर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय असा की,यापुर्वी तपासणी केली होती.ती नस्ती व अभिलेखासह फेरसादर करा "

मा.आयुक्त साहेब यांचे आदेशान्वये दिनांक २८/९/२००६ रोजी कार्यालयीन प्रस्ताव फेर सादर करुन सदरची नस्ती व अभिलेखासह मा.अन्नधान्य वितरण अधिकारी,अहमदनगर यांनी इकडेस सादर केलेल्या २८९ लाभार्थीच्या पात्रतेबाबत संबंधीत वॉर्ड चे प्रभारी विभाग अधिकारी यांचे अभिप्राय सात दिवसांत सुजयो विभागाकडे सादर करणेबाबतच्या ऑफीस रिपोर्टावर मा.उपायुक्त साहेब (कर ) यांचा अभिप्राय ठिक असा आहे.

सदरच्या आदेशाप्रमाणे १.श्री.आर.एम.ढाकणे,विभागीय अधिकारी,केडगांव विभाग

२. श्रीमती निलीमा बंडेलू , प्रसिध्दी अधिकारी , शहर भाग व मुंकुंदनगर विभाग

३.श्री.डी.बी.निंबाळकर/ के.सी.वर्मा सावेडी विभाग प्रमुख यांना अहमदनगर महानगरपालिका सुजयो जा.क्र.१६५ दिनांक १/११/२००६ अन्वयेच्या कार्यालयीन आदेशाद्वारे सदरच्या २८९ व्यक्तींच्या पात्रतेबाबत अहवाल सादर करणेस्तव शासन निर्णय क्रमांक : साविव्य १००३ / २६७२ / प्र.क्र.१२८८ / ना.पु. २८ दिनांक १६ ऑक्टोंबर २००३ च्या परिपत्रकासह लाभार्थींची यादी पुढील कार्यवाहीकरीता पाठविण्यात आलेली होती.

तत्पुर्वी जिल्हा पुरवठा कार्यालय अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.पुरवठा कार्या २१क / ७००/ २००६ दि. २१/०९/२००६ रोजी इकडेस पत्र पाठवुन सदरच्या लाभार्थीच्या यादी

मंजूरी प्राप्त झाल्या शिवाय लाभार्थींना धान्याचे वाटप करता येत नाही. तरी नियमानुसार मंजुरी बाबत कार्यवाही होणेस सत्वर विनंती त्यांनी संदर्भीय पत्रान्वये केलेली आहे. तसेच अन्नधान्य वितरण कार्यालय अधिकारी यांनी त्याचे कार्यालयाकडील पत्र क्रं.कावि/४/५९१/०६ दि.२५/०९/२००६ च्या पत्रान्वये तृतीय विस्तारीत अंत्योदय अन्न योजने अंतर्गत लाभार्थींची निवड होउन त्यानुसार पुढील आवश्यक ती सर्व कार्यवाही पुर्ण करुन लाभार्थींना योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळणेची कार्यवाही करणे बाबत मा.शासन अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मा.उपायुक्त (पुरवठा) नाशिक व मा.जिल्हा पुरवठा अधिकारी, अहमदनगर यांचेकडून या कार्यालयास सूचना प्राप्त होत आहेत. तरी ०७/०९/२००६ च्या पत्रान्वये सादर केलेल्या यादीस लवकरात लवकर मंजुरी देणे बाबत कळविलेले आहे.

केडगांव / बुरुडगाव या उपकार्यालयाचे प्रभारी विभाग अधिकारी श्री.आर.एम. ढाकणे यांनी त्यांचेकडील १०६ लाभार्थी तपासणी करुन १०६ पैकी ७१ पात्र, १७ अपात्र, १० मयत ८ पत्त्यावर आढळून येत नाही असा अहवाल जाक्रं.५२४ दि.१७/११/२००६ रोजीच्या पत्रान्वये इकडेस केला आहे. तसेच शहर व मुकुंदनगर या विभागातील ६२ लाभार्थींच्या बाबत प्रसिध्दी अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र प्रसिध्दी विभाग जाक्रं.३९३ दिनांक २०/११/२००६ अन्वये एकुण ६२ लाभार्थींच्या पात्रते बाबत ६० लाभार्थी पात्र, अपात्र -०, मयत-१, पत्त्यावर आढळून येत नाही-१ असा अहवाल इकडेस दिलेला आहे. तसेच सावेडी , नागापूर, बोल्हेगांव या

विभागातील १२१ लाभार्थीच्या पात्रतेबाबत सावेडी उपकार्यालयाचे विभागीय अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.४३० दि.२७/११/२००६ अन्वये एकूण १२१ लाभार्थींपैकी पात्र ५८ अपात्र - १६, मयत-९ व पत्त्यावर आढळून येत नाही - ३८ असा अहवाल इकडेस दिलेला आहे.

तरी तीनही विभागीय अधिकारी यांच्याकडील प्राप्त अहवालाप्रमाणे अन्नधान्य वितरण अधिकारी, अहमदनगर यांनी इकडेस सादर केलेल्या २८९ लाभार्थी पैकी १८९ लाभार्थी पात्र ,३३ लाभार्थी अपात्र, २० लाभार्थी मयत व ४७ लाभार्थी पत्त्यावर आढळून येत नाही असा अहवाल प्राप्त झालेला आहे.

तरी तीनही विभागीय अधिकारी यांचे अहवाल विचारात घेउन मा.अन्नधान्य वितरण अधिकारी, अहमदनगर यांचेकडून प्राप्त झालेल्या यादीतील पात्र लाभार्थींच्या यादीस मंजूरी मिळणे करीताचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याच्या आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त साो (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्ताव मान्यते करीता मा.महासभेपुढे ठेवणे योग्य.

यावर मा.आयुक्त साो, यांचा अभिप्राय की, नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

यावर मा.महापौर साो, यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवणे.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (कर), मा.आयुक्त साो, मा.महापौर साो, यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.महासभेपुढे ठेविला.

--*--

**चर्चा :**

श्री.नामदेव पवार : विषय मंजुर करण्यांत यावा.

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सुचक : मा.श्री. नामदेव शांताराम पवार.

अनुमोदक : मा.श्री. किशोर आसाराम डागवाले.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ४ दिनांक : २८/०२/२००७.

..............................................................................................................

**प्रस्तावाचा विषय** : केडगाव भागात सांस्कृतिक, सामाजिक व क्रीडा अशा विविध उपक्रमा करीता बहुउद्देशीय इमारत व खेळाचे मैदान विकसित करण्यांसाठी आरक्षीत जागा मा.शासनाकडून महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणे बाबतचे ऑफिस रिपोर्ट मान्यतेस्तव सादर.

---o---

**प्रस्तावाचा मजकूर** : अहमदनगर शहराची हद्दवाढ दिनांक ०१/०७/१९९९ रोजी झाल्या नंतर त्यामध्ये केडगाव परिसराचा समावेश झाला. तथापि त्या परिसरातील नागरिकांना सांस्कृतिक, सामाजिक व क्रीडा विषयक सुविधा अद्याप पावेतो महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. अशा सुविधा देण्यासाठी या परिसरातील नागरीक वारंवार मा.महापौर साहेब, यांचेकडे संपर्क साधीत आहेत असे मा.महापौर साहेब, यांनी संदर्भीत पत्रात नमुद केले आहे. त्या दृष्टीकोनातुन मा.महापौर यांनी माहिती घेतली असता केडगाव शहरात मध्यवर्ती भागात फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडीयाची जागा असून त्यामध्ये विकास योजनेतील काही आरक्षणे आहेत. या जागा संपादित करण्याकरीता उचित प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना मा.महापौर साहेब यांनी संदर्भीत पत्रान्वये दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने या विभागाचा अहवाल खालील प्रमाणे सादर करीत आहे.

१. सध्या शहराच्या दक्षिण - पश्चिमेस असलेल्या केडगाव परिसरात मोठ्या नागरी वसाहती असून सध्या तीथे सांस्कृतिक, सामाजिक व क्रीडा विषयक विशेष सुविधा उपलब्ध नाहीत ही वस्तुथिती आहे.

२. संदर्भीत पत्रात नमूद केलेल्या सि.स.नं.१७१४ ते १७१७ ही (स.नं.४२१/ १अ ) जागा केडगाव परिसराच्या मध्यवर्ती भागात आहे. त्यामुळे या जागेचा महानगरपालिकेने विकास केल्यास ते या भागातील नागरिकांच्या सोयीचे ठरणार आहे.

३. दिनांक १७/०५/२००६ रोजी ठराव क्रं.७ अन्वये अहमदनगर शहराच्या हद्दवाढीसाठी तयार केलेली विकास योजना (प्रारुप) प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. या विकास योजनेत संदर्भीत जागेवर ३२२ ते ३२८ ही आरक्षणे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. या आरक्षणांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | आरक्षण क्रं. | आरक्षणाचा हेतु | क्षेत्र हे.आर. | समुचित प्राधिकरण |
|---|---|---|---|---|
| १ | ३२२ | खेळाचे मैदान | ०.५३ | अहमदनगर महानगरपालिका. |
| २ | ३२३ | मुलांचे खेळाचे मैदान | ०.२३ | अहमदनगर महानगरपालिका. |
| ३ | ३२५ | बहुउद्देशीय सभागृह | ०.३९ | अहमदनगर महानगरपालिका. |
| ४ | ३२६ | वाहनतळ | ०.१० | अहमदनगर महानगरपालिका. |
| ५ | ३२७ | ग्रंथालय | ०.१३ | अहमदनगर महानगरपालिका. |
| ६ | ३२८ | भाजी मार्केट/ दूकाने व कार्यालय | ०.२९ | अहमदनगर महानगरपालिका. |

अशा आरक्षणा व्यतिरिक्त या जागेतुन १२.०० मी. रुंद रस्ता प्रस्तावित केलेला आहे. त्याचे संपादन करणे आवश्यक आहे.

४. उपरोक्त जागेच्या मालकी हक्का बाबत माहिती घेतली असता ती संपूर्ण जागा महाराष्ट्र शासनाच्या मालकीची असल्याचे उपलब्ध अभिलेखा वरुन आढळून येते. (सोबत ७/१२ उतारे व मालमत्ता कार्डाचे उतारे सादर करीत आहे.)

सबब या जागा महाराष्ट्र शासनाकडून महानगरपालिकेस हस्तांतरण करुन घेण्यासाठी प्रस्ताव मा.महासभेस सादर करणे आवश्यक आहे.

उपरोक्त सर्व आरक्षणांपैकी आरक्षण क्र ३२८ वगळता उर्वरित सर्व आरक्षणे अनुत्पादित स्वरुपाची असल्याने (Non Remmunerative ) शासन परिपत्रकानुसार विना मोबदला हस्तांतरीत होणे आवश्यक असते. असे असले तरी आरक्षण क्र.३२८ च्या भूसंपादनासह याकामी येणा-या खर्चासह सदर जागा महानगरपालिकेस हस्तांतरण करण्याची विनंती मा.शासनास करणेकामी मंजूरी मिळणे बाबत विनंती मा.महासभेस करणे योग्य होईल.

सबब सदर प्रस्ताव मा.महासभेस सादर करणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे अ.क्रं.१ ते ६ या आरक्षीत जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणेबाबत शासनास मागणी करणेसाठीचा प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणे योग्य राहील. मान्यतेस्तव सादर.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (कर), मा.आयुक्त साो, मा.महापौर साो, यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.महासभेपुढे ठेविला.

चर्चा :

श्री.नामदेव पवार :- मंजूर.

श्री.अभय आगरकर :- हा विषय मंजूर करावा मंजूर करण्यास हरकत नाही. परंतु अशाप्रकारे किती जागा आहेत सावेडी व इतर भागात.

श्री.धोंगडे नगररचनाकार :- ही माहिती गोळा करावी लागेल.

श्री.अभय आगरकर :- हा विषय जनरल बोर्डात आला तर याबाबतची माहिती आपणाकडे Up to Date असली पाहिजे.

मा.महापौर :- ही जागा सरकारची आहे. आरक्षण पडल्यामुळे महाराष्ट्र शासन विना मोबदला घेत आहे.

श्री.अभय आगरकर :- उर्वरीत ११ गावामध्ये ज्या जागा आहेत त्याची माहिती तयार असली पाहिजे प्रशासन तयारी करुन का ? येत नाही माहिती देता येत नसेल तर नाही म्हणुन सांगा. ह्या

सभागृहामध्ये फक्त हेडनीच हजर राहीले पाहिजे दुसरे कोणतेही अधिकारी या सभागृहा मध्ये हजर राहता कामा नये.

श्री.नामदेव पवार :- इतर १२ गावांची माहिती सुध्दा तयार करुन पुढील जनरल बोर्डामध्ये ठेवण्यात यावी.

श्री.घुले :- केडगाव येथील सार्व.क्रीडा संकुलाचा विषय घेतल्याबद्दल अभिनंदन करतो श्री.संकलेचा श्री.पंकज शिरसाठ, यांनी खेळामध्ये नाविन्य मिळविलेले आहे. व अशा प्रकारे अनेक खेळाडु तयार व्हायला पाहिजे हा एक चांगला उपक्रम हाती घेतलेला आहे. तसेच रंगभुवन व इतर ठिकाणचेही काम लक्ष घालुन करावा ही विनंती.

सौ.वर्षा अरिफ :- मंगला गुंदेचा नगरसेविका यांचे पती सतिष गुंदेचा यांचे निधन झाल्यामुळे मी व माझे कुटुंबीय त्यांचे दु:खात सहभागी आहे. महानगरपालिकेची कामे टेंडर मागवुन केली जाते ती टेंडर मागवुन न करता ठेकेदारा मार्फत करण्यात यावी कारण टेंडर मागविण्यात आले तर टेंडर मागविण्याची मुदत टेंडर फोडण्यास वेळ, टेंडर जादा दराचे आले तर निगोसिएशन करणेसाठी मुदत, निगोसिएशन झाले नाही तर परत फेर टेंडर काढणे असा बराच कालावधी टेंडरचे कामासाठी जात आहे व त्यामुळे लवकर होत नाही.

मा.महापौर :- टेंडर पध्दतीने नागरिकात व नगरसेवकात असंतोष पसरलेला आहे. कामे चांगल्या पध्दतीने झाली पाहिजे व लवकर झाली पाहिजे मा.आयुक्त यांनी कामा संदर्भात लक्ष द्यावे.

मा.आयुक्त :- कुठलीही कामे अडता कामा नये याबाबत मा.शासनाने Clear quide Line दिलेल्या आहेत वेळ लागतो फक्त Procedure साठी टेंडर आल्यानंतर त्याच दिवशी उघडल्या जातात मा.शासनाचे quide लाईन प्रमाणे सोसायटीचा कोटा संपलेला आहे.

सौ.वर्षा अरिफ :- माझे स्वत:चे वार्डाचे काम ४ लाखाचे आहे ब-याच दिवसापासुन टेंडरचीच कार्यवाही अजुन पुर्ण झालेली नाही. आम्ही त्या विभागातुन निवडून आलेलो आहेत व पुढे निवडणूका आलेल्या आहेत त्यामुळे काम लवकर होणे गरजेचे आहे.

श्री.चोपडा :- ओपन टेंडर मध्ये एक एक वर्ष गेलेला आहे.

श्री.फुलसौंदर :- बुरुडगांव रोड पाण्याचे काम २००४ साली मंजूर झाले अद्याप काम झालेले नाही.

श्री.मुदस्सर :- ४ महिने झाले तरी ७५ लाखाचा टेंडर काढले नाही.

श्री.मगर :- वॉर्ड नं.४ मधील कामांसाठी बेरोजगार अभियंता यांचे नेमणुकीसाठी अधिक्षक अभियंता यांना पत्र दिलेले आहे.

श्री.भानुदास कोतकर :- टेंडर फोडण्यास उशीर का लागला याचा खुलासा करा.

श्री.सावळे इलेक्ट्रीक सुपरवायझर :- उपायुक्त कर मुख्य लेखा परिक्षक यांचे समक्ष २० जानेवारीला आलेले टेंडर काल फोडण्यात आले आहे.

श्री.भानुदास कोतकर :- आपलीच कमिटी, आपलीच माणस, मात्र पत्र जाण्यासाठी २-२ दिवस कशासाठी लागतात.

श्री.मैड :- रु. ३० लाखाचे मटन मार्केटचे काम का झालेले नाही.

श्री.कृष्णा जाधव :- मटन मार्केटचा विषय त्या ठिकाणी भाजी मार्केट व्हावे म्हणुन गेला होता परत मटन मार्केट साठी प्रस्ताव पाठविला गेला असेल ठराव बदललेला आहे.

श्री.नामदेवराव पवार :- मटन मार्केटची दुरुस्ती करावी.

श्री.कृष्णा जाधव :- विषय क्रमांक ४ ची ६ आरक्षणाची संपुर्ण जागा शासनाची आहे का ?

श्री.धोंगडे :- होय शासनाच्या मालकीची आहे.

श्री.कृष्णा जाधव :- महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे उद्यानाची मोटार जळाली ६ महिने झाले दुरुस्त होत नाही. दिलेल्या एकही सूचनांची अंमलबजावणी झालेली नाही.

उपायुक्त :- दिवे लावण्याचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे.

मा.आयुक्त :- पुढील महासभेत बा.दे.उद्यानाचा विषय घेण्यात येणार आहे.

मा.महापौर :- नगरसेवक फंडातील रु.३ लाखापर्यंतची कामे सोसायटी मार्फत करावी.

श्री.फुलसौंदर :- बुरुडगांव सर्व्हे नं.१४६ बाबुसेठ बोरा यांनी बांधुन दिलेले काम रेंगाळलेले आहे. फॉलोअप ठेवावा ही विनंती.

मा.आयुक्त :- सभागृह बांधणे चालू आहे. रस्ता कमी रुंदीचा आहे. त्यामुळे मा.शासनाकडे Request करावी लागेल.

श्री.शेळके :- केडगांव हा बारा गावात समावेष करायचा किंवा नाही बरेच दिवस चर्चा होती नंतर हा भाग १२ गावांमध्ये १९९९ साली घेण्यात आला. १२ गावांचे जमिनीचे उतारे नगररचनाकार यांनी घेतलेले आहे परंतु अद्याप पूर रेषा नाही पूर रेषे संदर्भात नियोजन करावे.

-- *--

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर. तदनुषंगिक खर्च मंजुर मा.शासनाकडील जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत व्हावी याकरीता मा.शासनाकडे सदरचा ठराव पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे. आवश्यकतेनुसार याकामी भुसंपादनाच्या खर्चास मंजुरी देण्यात येत आहे. नियमानुसार कार्यवाही करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सुचक : मा.श्री. नामदेव शांताराम पवार.

अनुमोदक : मा.श्री. किशोर आसाराम डागवाले.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.